(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोटकलम (४) सहभूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क-अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी जारी केलेली अधिसूचना)

**अधिसूचना**

जिल्हाधिकारी यांचेकडून

क्र.२०१७/आरबीडेस्क/एलएक्यू/समन्वय/भूसं/CR-०१/२०१८ दि. १२/०२/२०१८

१. ज्या अर्थी, औरंगाबाद महानगरपालिकेची मूळ हद्दीची सुधारित विकास योजना (यापुढे उक्त विकास योजना अशी संबोधलेली) शासनाच्या नगर विकास विभागाच्या अधिसुचना क्र.टीपीएस/३०९९/११०७/प्र.क्र.४७/२०००/नवि-३० दि. १८/०४/२००१ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ पोटकलम (१) अन्वये (या पुढे उक्त महाराष्ट्र अधिनियम असे संबोधलेले) मंजूर केली असून ती दि. ०१/०६/२००१ पासून अमंलात आलेली आहे.

२. आणि ज्या अर्थी सोबतच्या अनूसूची मध्ये नमुद केलेल्या जमिन (यापुढे उक्त जमिनी अशा संबोधलेल्या) उक्त विकास योजनेत ३०.० मी रुंद विकास योजना रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षीत आहेत. (यापुढे उक्त सार्वजनिक प्रस्ताव असे संबोधिलेले)

३. आणि ज्या अर्थी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद (यापुढे उक्त समुचित प्राधिकरण असे संबोधलेले) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ (१) अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत शासनाकडे अर्ज केलेला आहे.

४. आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचना क्र.टीपीएस-२१७५/५१०६/युडी-७, दि. ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्देशित करण्यात आलेल्या जमीनी संपादना बाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाचे कलम १२६ पोट कलम (१) (२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

५. आणि ज्या अर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी सार्वजनिक, प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

६. आणि ज्या अर्थी, उक्त जमीनीच्या संपादन पोटी द्यावयाच्या नूकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त समुचित प्राधिकरणाने अदा करावयाची आहे.

७. आणि ज्या अर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (२) मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटुन गेलेली आहे.

८. त्या अर्थी, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत खात्री पटली आहे; आणि म्हणुन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६ (४) सह भूमिसंपादन, पुनवर्सन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क-अधिनियम, २०१३ (२०१३ या ३०) (यापूढे उक्त संपादन अधिनियम म्हणून संबोधिलेला) चे कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

९. आणि ज्या अर्थी, उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त संपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यास पदनिर्देशित करीत आहे.

१०. उक्त जमीनीचे नकाशे विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका प्रशासकीय इमारत, टप्पा क्र. ३ पहिला मजला यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव- औरंगाबाद, तालुका- औरंगाबाद, जिल्हा- औरंगाबाद

| अनुक्रमांक | नगर भूमापन क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | ३२४ | १९४ चौ.मी.<br>बांधकाम क्षेत्र ११६.६ चौ.मी.<br>खुले क्षेत्र ७७.४ चौ.मी. |

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- मकाई गेट ते विद्यापीठ गेट ३० मी रुंद विकास योजना रस्ता

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :- रस्ता रुंदीकरण करणे.

समाजाला होणारे लाभ :- रस्त्याची सूविधा पूरविणे.

दिनांक : १२/०२/२०१८

ठिकाणः औरंगाबाद

स्वाक्षरीत/-

जिल्हाधिकारी, औरंगाबाद